बाहययंत्रणेद्वारे (आऊटसोर्सिग) घेण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांच्या सेवेचा मोबदला अदा करण्यासाठी आलेल्या खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्रमांकः सुरक्षा-२०१७/ प्र.क्र.१४/ आरोग्य-४

मंत्रालय, १० वा मजला, संकूल इमारत,
गोकूळदास तेजपाल रूग्णालय आवार, मुंबई.

तारीख : १९ मार्च, २०१८.

वाचा :-

(१) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्र.:- संआसे/राज्यस्तर/टे-५/कक्ष-३/कंत्राटीसुरक्षारक्षक/प्र.दे/२२२१-२३/१७, दि.१४.०३.२०१७.

(२) सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई यांचे पत्र क्र. :- संआसे/टे-५/कक्ष-३/कं.सु.से./परभणी/प्रल.देयक/मेस्को/११५९-६०/१८, दि.०६.०२.२०१८.

प्रस्तावना :-

जिल्हा रुग्णालय, परभणी व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपजिल्हा रुग्णालय, सेलू व गंगाखेड आणि ग्रामीण रुग्णालय, मानवत, जिंतूर, बोरी, पालम व पुर्णा या रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१०/प्र.क्र.८४/१०/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.०८.२०१६ मधील तरतूदीनुसार बाह्ययंत्रणेद्वारे महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को), पुणे यांचेकडून सन २०१४ ते २०१७ या कालावधीत सुरक्षा रक्षकांच्या सेवा उपलब्ध करुन घेण्यात आल्या होत्या. त्या सुरक्षा रक्षकाच्या सेवेपोटी रु.३७,२७,३३९/- (अक्षरी रुपये सदोत्तीस लक्ष, सत्तावीस हजार, तीनशे एकोणचाळीस फक्त) इतकी रक्कम महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) पुणे यांना अदा करण्यास कार्योत्तर मान्यता देण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :-

जिल्हा रुग्णालय, परभणी व त्यांच्या अंतर्गत असलेल्या उपजिल्हा रुग्णालय, सेलू व गंगाखेड आणि ग्रामीण रुग्णालय, मानवत, जिंतूर, बोरी, पालम व पुर्णा या रुग्णालयाच्या सुरक्षेसाठी सन २०१४ ते २०१७ या कालावधीती महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को), पुणे यांचेकडून सेवा घेण्यात आल्या होत्या. त्याबाबत (अ) जिल्हा रुग्णालय, परभणी येथील सुरक्षा रक्षकाच्या देयकाची रु.१६,१९,२१८/- इतकी रक्कम, (ब) जिल्हा रुग्णालय, परभणी यांच्या अंतर्गत असलेल्या उपजिल्हा रुग्णालय, सेलू व गंगाखेड येथील सुरक्षा रक्षकाच्या देयकाची रु.४,७५,४७०/- इतकी रक्कम, (क) ग्रामीण रुग्णालय, मानवत, जिंतूर, बोरी, पालम व पुर्णा येथील सुरक्षा रक्षकाच्या देयकाची रु.१६,३२,६५१/- इतकी रक्कम, महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को), पुणे यांना अदा करण्यास खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे :-

१) सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मदतीने त्यांचे कार्यालयाचे मोजमाप करुन व त्यानुसार प्रचलित कार्यध्दतीने निविदा प्रक्रियापूर्ण करुन संबंधित कंत्राटदार / संस्था यांचेशी योग्य प्रकारे करार केलेला असावा.

२) बाह्ययंत्रणेद्वारे काम करुन घेताना आवश्यक कामे ठेकेदार /कंपनी / संस्थेकडून शासनाचे विहीत पध्दीतीने निविदा मागवून सक्षम प्राधिकारी यांच्या मान्यतेने केलेले असावे.

३) ज्या कंपनीस / संस्थेस काम सोपविले होते. त्यांचे बरोबर त्याबाबतचा करार झालेला असावा. सदर करारात आवश्यकतेनुसार अटी व शर्ती नमूद असाव्यात. या करारामध्ये कंपनी / संस्थेतर्फे काम करणाऱ्या अधिकारी /कर्मचारी यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर नसावी.

४) बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याकरीता कोणतीही पदनिर्मिती केली जाणार नाही.

५) बाहय यंत्रणेद्वारे काम करुन घेण्याच्या कामाचे प्रदान "वेतन" या तपशीलवार शिर्षाखाली न दाखविता "कार्यालयीन खर्च" या तपशीलवार शिर्षाखाली दाखविणे आवश्यक आहे.

६) बाहय यंत्रणेद्वारे कामे करुन घेताना, जर ती कामे नियमितपणे पदनिर्मिती करुन केली असता जितका खर्च आला असता त्या खर्चाच्या कमीत कमी १० ते २५ टक्के इतकी बचत होणे आवश्यक आहे.

७) शासनाने विहित केलेल्या पध्दतीने निविदा प्रक्रिया पार पाडून अत्यंत पारदर्शक पध्दतीने बाहययंत्रणेची निवड केलेली असावी.

८) नियमित पध्दतीने पदे भरण्यावरील खर्चाच्या तुलनेत बाहययंत्रणेद्वारे उपरोक्तनुसार सेवा घेताना खर्चात १० ते २५ टक्के बचत झाली असल्याबाबतचा तपशील, शासन परिपत्रक क्र.पदनि-२०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दि.०२.१२.२०१३ सोबतच्या प्रपत्रात शासनास सादर करणे आवश्यक आहे.

९) वरील सूचनांचे कोटेकोरपणे पालन सर्व संबंधितांनी करावे, अन्यथा संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांच्या विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

१०) याकरीता होणारा खर्च विहित पध्दतीने करण्यात यावा.

२. सदर शासन निर्णय, वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक-विअप्र २०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दिनांक १७ एप्रिल, २०१५, अन्वये, वित्तिय अधिकार नियम पुस्तिका - १९७८ भाग पहिला, उपविभाग-एक मधील अ.क्र.६, नियम क्र. ४० अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकारात निर्गमित करण्यात येत आहे.

३. याबाबत, (अ) परभणी येथील जिल्हा रुग्णालयाच्या सुरक्षेसाठी झालेला आवर्ती खर्च मागणी क्र.आर-१, "२२१०-वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०१ - नागरी आरोग्य सेवा-विषम चिकित्सा, ११० - रुग्णालये व दवाखाने, ११० - २ - मुफसल क्षेत्रातील शासकीय रुग्णालये व दवाखाने, (०१) (०१) - मुफसल क्षेत्रातील अध्यापनेत्तर शासकीय रुग्णालये (२२१००१४६)" (ब) परभणी जिल्हयातील सेलू व गंगांखेड येथील उपजिल्हा रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी झालेला आवर्ती खर्च मागणी क्र.आर-१, "२२१० -

वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ - सार्वजनिक आरोग्य, ००१ - संचालक व प्रशासन, (००१) (०९), महाराष्ट्र राज्य आरोग्य सेवा विकास प्रकल्पाअंतर्गत ग्रामीण/कुटीर रुग्णालयाचे उपजिल्हा रुग्णालयामध्ये श्रेणीवर्धन (२२१०४६२४)" आणि (क) परभणी जिल्हयातील, मानवत, जिंतूर, बोरी, पालम व पुर्णा येथील ग्रामीण रुग्णालयांच्या सुरक्षेसाठी झालेला खर्च मागणी क्र.आर-१, "२२१० - वैद्यकिय सेवा व सार्वजनिक आरोग्य, ०६ - सार्वजनिक आरोग्य, ००१ - संचालक व प्रशासन, (००१) (०८), प्राथमिक आरोग्य केंद्राचा ग्रामीण रुग्णालय इतका दर्जा वाढविणे (२२१००४१३)" या लेखाशिर्षाखालील "१३-कार्यालयीन खर्च" या उद्दिष्टाखाली सन २०१७-१८ या वित्तिय वर्षाकरीता मंजूर करण्यात आलेल्या अनुदानामधून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३१९१२०७०२२६१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Pradip M Balkavde

Digitally signed by Pradip M Balkavde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Public Health Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8db6aab31faca2f1a89698a28c94703436c07cda664672d20607766dc59d345b, serialNumber=ed0fa40788bb5c0d7f76b869fa2e5835af215c6a80eae8f70eaf87b0cf68d63f, cn=Pradip M Balkavde
Date: 2018.03.19 17:07:21 +05'30'

(प्र.मो.बलकवडे)
अवर सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग,
महाराष्ट्र शासन

प्रत,

१. संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई.
२. सहसंचालक, आरोग्य सेवा, रुग्णालये (राज्यस्तर), मुंबई
३. सहाय्यक संचालक (लेखा व लेखापरिक्षा),आरोग्य सेवा, पुणे.
४. सहसंचालक, आरोग्य सेवा (अर्थ व प्रशासन), मुंबई/ पुणे.
५. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे.
६. महालेखापाल १/२, महाराष्ट्र (लेखा व लेखापरिक्षा) / लेखा व अनुज्ञेयता, मुंबई/ नागपूर.
७. महाराष्ट्र माजी सैनिक महामंडळ मर्या. (मेस्को) पुणे.
८. विनियम कार्यासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सा.आ.वि., मंत्रालय, मुंबई.
१०.निवडनस्ती (आरोग्य-४).